उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग
ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.
मुख्यकार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हाठाणे, महाराष्ट्र
Head Office, Ground Floor,Ulhasangar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra
Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४


जा.क्र./उमपा/करवि/ यु १/७२८/२८
दि. 7 / 7/ २५

विषय:— मालमत्ता क्रं 10AO020444800 अन्वये जुना मालमत्ता क्रं 10/0823 या मिळकतीचे नाव रद्द करून पुर्नवत प्रमाणे करणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता क्रं. **10AO020444800** अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देणेस प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन श्री.जितु मनोहर बालानी अशी नोंद करणेत आलेली आहे.

**करपात्र बाबींचा क्षेत्रफळाचा तपशिल पुढीलप्रमाणे**

| Const.Type | Occu.Status | Usage | Annual Rent | Asst.Year | Total Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| Tear Gardier | Owner | Residential | 0 | 01/04/2022 | 102.57 | 102.57 |
| AC Sheet Bricks | Owner | Residential | 0 | 01/04/2022 | 101 | 101 |

विषयांकित मिळकतीकरीता खालीलप्रमाणे नाव हस्तांतरण करण्यात आलेले आहे.

**मुद्दा क्र. (१)** जा.क्र./उमपा/करवि/यु.१/३०८ /२०२३ दि. ०८/११/२०२३ रोजी नाव हस्तांतरण आदेश पारीत करण्यात आला असुन उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता क्रं. **10AO020444800** अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देणेस प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन श्री.जितु मनोहर बालानी अशी नोंद करणेत आलेली आहे.

**मुद्दा क्र. (२)** तदनंतर श्रीमती संगिता उर्फ अब्दुल इब्राहिम शेख यांनी दि. २०/०२/२०२५ रोजी हरकत दाखल केलेली आहे.

**मुद्दा क्र. (३)** सदर आक्षेपाच्या अनुषंगाने श्री.जितु मनोहर बालानी यांना सुनावणीस हजर रहाणेबाबत सुनावणीचा दिवस,वेळ व ठिकाण निर्दिष्ट करणारी लेखी नोटीस दिनांक 16/04/2025 रोजी देण्यात आली होती. सदर तिनही सुनावणी दरम्यान अर्जदार — श्रीमती संगिता उर्फ अब्दुल इब्राहिम शेख हे उपस्थित होते व गैरअर्जदार — श्री.जितु मनोहर बालानी हे अनुपस्थित होते.

त्यानंतर पुन्हा दिनांक 17/06/2025 व 26/06/2025 रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर दोन्ही सुनावणी दरम्यान अर्जदार — श्रीमती संगिता उर्फ अब्दुल इब्राहिम शेख हे उपस्थित होते व गैरअर्जदार — श्री.जितु मनोहर बालानी हे अनुपस्थित होते.

तसेच श्रीमती संगिता उर्फ अब्दुल इब्राहिम शेख यांनी दिनांक 16/04/2025 रोजी सुनावणी दरम्यान संबंधित मालमत्ता क्र. **10AO020444800** अन्वये ही श्रीम. हिना मोहम्मद शेख यांची असुन त्यांच्या मृत्युपश्चात बोगस कागदपत्रे बनवुन श्री.जितु मनोहर बालानी यांनी स्वत:चे नावावर केली असल्याचे सांगितले

उक्त कागदपत्र पाहता असे समजते की, श्री.जितु मनोहर बालानी यांनी सदर मिळकत बोगस कागदपत्रे बनवुन विना साक्षीदारांच्या सहीने सदर मिळकतीची करपावती स्वत:चे नावावर केल्याचे दिसुन येत आहे.

सबब उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता क्रं.**10AO020444800** अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देणेस प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन श्रीम. हिना मोहम्मद शेख या नावाची नोंद कायम ठेवणेकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

यास्तव विषयांकित प्रकरणी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता क्रं.**10AO020444800** अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देणेस प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन श्रीम. हिना मोहम्मद शेख अशी नोंद कायम ठेवण्यात येत आहे.

मयुरी 7/7/025

(मयुरी कदम)
कर निर्धारक व संकलक
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत:—
१) श्रीमती संगिता उर्फ अब्दुल इब्राहिम शेख
२) निवडनस्ती